
# जिल्ह्यात आजपर्यंत ११ हजार, ७८१ रुग्ण 'कोरोनामुक्त'

## सद्यस्थितीत ४ हजार, ३३५ रुग्णांवर उपचार सुरू



**नाशिक, दि. ४ (प्रतिनिधी):** जिल्हा सामान्य रुग्णालयामार्फत मंगळवार, दि. ४ रोजी प्राप्त अहवालानुसार जिल्ह्यातील ११ हजार, ७८१ कोरोनाबाधितांना डिस्चार्ज देण्यात आला असून सद्यस्थितीत ०४ हजार, ३३५ रुग्णांवर उपचार सुरु असून आत्तापर्यंत ५३३ रुग्णांचा मृत्यू झाला आहे, अशी माहिती जिल्हा सामान्य रुग्णालयाचे निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. अनंत पवार यांनी दिली आहे.

नाशिक ग्रामीणमध्ये नाशिक १४८, चांदवड ३५, सिन्नर १८७, दिंडोरी ६६, निफाड २२१, देवळा १२०, नांदगाव ७९, येवला ०६, त्र्यंबकेश्वर २६, सुरगाणा १५, पेठ ००, कळवण ०२, बागलाण ३२, इगतपुरी ४६, मालेगाव ग्रामीण ४४ असे एकूण १०२७ 'पॉझिटिव्ह' रुग्णांवर उपचार आहे. तसेच नाशिक महानगरपालिका क्षेत्रात ३ हजार, १७५, मालेगाव महानगरपालिका क्षेत्रात १२८, तर जिल्ह्याबाहेरील ०५ असे एकूण ४ हजार, ३३५ रुग्णांवर उपचार सुरु आहेत. तसेच आजपर्यंत जिल्ह्यात १६ हजार, ६४९ रुग्ण आढळून आले आहेत.

### रुग्ण बरे होण्याची टक्केवारी

जिल्ह्यात रुग्ण बरे होण्याची टक्केवारी नाशिक ग्रामीणमध्ये ७०.४२ टक्के, नाशिक शहरात ६९.३१ टक्के, मालेगावमध्ये ८४.३३ टक्के, तर जिल्हा बाह्य रुग्णांचे बरे होण्याचे प्रमाण ८४.७६ टक्के आहे. तसेच जिल्ह्यात बरे होण्याचे प्रमाण ७०.९६ इतके आहे.

### मृत्यू

नाशिक ग्रामीण १२७, नाशिक महानगरपालिका क्षेत्रातून ३००, मालेगाव महानगरपालिका क्षेत्रातून ८६ व जिल्हा बाहेरील २० अशा एकूण ५३३ रुग्णांचा मृत्यू झाला आहे.

### लक्षणीय

१६ हजार, ६४९ कोरोनाबाधित रुग्णांपैकी ११ हजार, ७८१ रुग्ण पूर्णपणे बरे झाल्याने त्यांना 'डिस्चार्ज.'

सध्या जिल्ह्यात उपचार घेत असलेले ४ हजार, ३३५ 'पॉझिटिव्ह' रुग्ण. जिल्ह्यात बरे होण्याचे प्रमाण ७०.९६ टक्के.

### 'लासलगाव कोविड सेंटर'मधून तीन रुग्ण 'कोरोनामुक्त'

लासलगाव ग्रामीण रुग्णालयातील 'कोविड केअर सेंटर'मध्ये कोरोना तपासणी अहवाल 'पॉझिटिव्ह' आल्याने उपचार घेत असलेल्या निफाड तालुक्यातील तीन रुग्णांनी कोरोनावर मात केल्याने मंगळवारी त्यांना 'डिस्चार्ज' देण्यात आले. यावेळी ब्राह्मणगाव (विंचूर) ०१, निफाड ०१ आणि ओझर ०१ अशा या तीन रुग्णांना 'डिस्चार्ज' देताना डॉक्टर, परिचारिका, आरोग्य विभागाचे कर्मचाऱ्यांनी टाळ्यांच्या गजरात अभिनंदन केले. गेल्या अडीच महिन्यांत आतापर्यंत १७९ कोरोनाबाधित रुग्णांनी लासलगाव 'कोविड सेंटरमधून कोरोनामुक्त' होत घरवापसी केली.

# 'सम-विषम' या शासनाच्या धोरणामुळे व्यावसायिकांची आर्थिक कोंडी

**सटाणा, दि. ४ (प्रतिनिधी):** शासनाने घालून दिलेला 'सम-विषम' या प्रकारामुळे तूर्त छोटे व्यावसायिक यांची मोठी आर्थिक कोंडी झालेली दिसून येत आहे. 'लॉकडाऊन', 'कंटेनमेंट झोन', बंद अशा अनेक समस्यांना नागरिकांनी तोंड दिलेले आहे. मात्र, आज सर्व व्यावसायिकांचा संयम तुटलेला आहे.

आर्थिक नियोजन कोलमडले आहे. घराचे भाडे, दुकानाचे भाडे, बँकेचे हप्ते, फायनान्सचे हप्ते, हात उसनवारी घेतलेले कर्ज, कुठल्याही गोष्टींतून नागरिकांची सुटका झालेली नाही. शासनाने फक्त पोकळ घोषणा करून नागरिकांचे मनोरंजन केले आहे, असेही नागरिकांचे म्हणणे आहे. प्रत्येक माणसाच्या डोक्यावर कर्जाचा बोजा वाढताना दिसून येत आहे. शासनाने कुठलाही विचार न करता सरसकट 'सम-विषम' नावाची मुस्कटदाबीचा नियम व्यवसायिकांच्या माथी मारून त्यांना घायाळ केलेले आहे. 'सम-विषम'प्रमाणे महिन्यातून फक्त १५ दिवस दुकान सुरू ठेवायचे आहे. जर महिन्याला पाच ते दहा हजार रुपये भाडे असेल तर तेवढे भाडे फक्त पंधरा दिवसांसाठी त्यांना द्यावे लागणार आहे. लाईट बिल द्यावेच लागणार आहे. नगर परिषदेचा करही पूर्ण भरावा लागणार आहे. या सर्व खर्चाची ५० टक्के जबाबदारीही शासनाने घ्यावी, असे अनेक व्यावसायिकांचे मत आहे. 'सम-विषम' या नियमामुळे अनेक व्यावसायिकांचे नुकसान झाल्याने शासनाकडून त्यांना १५ दिवसांचे अनुदानसुद्धा मिळावे, असेही व्यावसायिकांचे मत आहे.

आज इलेक्ट्रिक, प्रिंटिंग प्रेस, सुतारकाम, वर्कशॉप, सलून, छोटी-मोठे हॉटेल, मोटरसायकल गॅरेज, टीव्ही रिपेअरिंग, स्टेशनरी, कापड दुकान, नर्सरी, मोबाईल रिपेअरिंग, हातगाडीवर व्यवसाय करणारे व्यावसायिक अशा कुठल्याही व्यवसायाला आज मोठे चलन राहिलेले नाही. शाळा सुरू होत नाहीत. त्यामुळे शाळेवर अवलंबून असलेले सगळेच व्यवसाय आज ठप्प आहेत. लाखो रुपये कर्ज घेऊन अनेक व्यावसायिकांनी आपल्या दुकानात माल भरून ठेवलेला आहे. मात्र, ग्राहक नसल्याने तेही अडचणीत सापडले आहेत.सटाणामध्ये जर हजारांपैकी १०० दुकानांत जरी पाचपर्यंत व्यक्ती काम करत असतील, तर 'सम-विषम'मुळे ५०० लोकांना महिन्यातून फक्त १५ दिवस काम मिळतं. या असंघटित कामगारांना रोजगार मिळत नाही. त्यांच्यावर उपासमारीची वेळ आलेली आहे.

> दुकाने बंद राहिल्यावर मन थाऱ्यावर राहत नाही. अनेक विचार डोक्यामध्ये येतात. शासनाने लवकरात लवकर 'सम व विषम' हा नियम मोडून सरसकट ५ वाजेपर्यंत दुकाने सुरू करण्यास परवानगी द्यावी, असे सर्व व्यापाऱ्यांचे मत आहे.
>
> – शांताराम अहिरे

> **...अन्यथा जनआंदोलन उभे राहील**
>
> 'सम-विषम'मुळे व्यावसायिक लोक अडचणीत आलेले आहे. मात्र, प्रशासन या गोष्टीकडे डोळेझाक करून फक्त बघ्याची भूमिका घेत आहेत. नागरिकांचा संयम तुटलेला आहे. जर शासनाने लवकर 'सम-विषम' हा नियम हटवला नाही, तर मोठे जनआंदोलन उभे राहू शकते आणि मग होणाऱ्या परिस्थितीत फक्त शासन जबाबदार राहील.
>
> – **अरविंद सोनवणे**, अध्यक्ष, ग्राहक संघ सटाणा

# तपोवनातील माती व तीर्थ अयोध्येकडे रवाना

**नाशिक, दि. ४ (प्रतिनिधी) :** श्रीक्षेत्र अयोध्या येथे बुधवारी होणाऱ्या श्रीराम मंदिराच्या शिलान्यासाच्या पार्श्वभूमीवर प्रभू रामचंद्रांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या तपोवनातील माती व कपिला-गोदावरी संगमातील तीर्थाची पूजा करून अयोध्या येथे रवाना करण्यात आली. तपोवनातील भारत सेवाश्रम संघ या ठिकाणी झालेल्या कार्यक्रमाप्रसंगी पंचमुखी हनुमान मंदिराचे महंत भक्तिचरणदास महाराज, भारत सेवाश्रम संघ आश्रमाचे स्वामी परिपूर्णनंदजी महाराज, महंत सुधीरदास पुजारी, माधवदास महाराज राठी, महंत वैजनाथ महाराज, दीपक बैरागी, योगेश बर्वे, महंत दानारामदासजी महाराज यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे पौरोहित्य पंडित मनोज पांडे यांनी केले. नाशिक जिल्ह्यातील सर्वतीर्थ टाकेद, कपिलधारा तीर्थ, त्र्यंबकेश्वर येथील माती व तीर्थही अयोध्या येथे पाठविण्यात येणार आहे.

# माजी सैनिकांच्या पाल्यांना शिष्यवृत्ती योजना जाहीर

## १५ ऑक्टोबर पूर्वी अर्ज सादर करण्याचे आवाहन

**नाशिक, दि.४ (प्रतिनिधी):** नाशिक जिल्ह्यातील सर्व माजी सैनिक आणि वीरपत्नी यांच्या पाल्यांना शैक्षणिक वर्ष २०२०-२०२१ साठी शिष्यवृत्ती योजना जाहीर करण्यात आली असून, १५ ऑक्टोबर २०२० पूर्वी अर्ज सादर करण्याचे आवाहन भागवत डोईफोडे, जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, नाशिक यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे.

सदर अर्ज हे १० ऑगस्टपासून स्वीकारले जाणार असून, चालू शैक्षणिक वर्षात माजी सैनिक आणि वीरपत्नी यांच्या पाल्यांना इयत्ता दहावी, इयत्ता बारावी आणि पदविका परीक्षा किमान ६० टक्के किंवा त्यापेक्षा जास्त गुणांसह उत्तीर्ण झाले असतील व या पाल्यांनी पुढील शिक्षणासाठी महाविद्यालयात अथवा अन्य शिक्षण संस्थेत प्रवेश घ्यायचा असेल अशांसाठी शैक्षणिक शिष्यवृत्ती देण्यात येणार आहे.

सदर योजनेचा जिल्ह्यातील जास्तीत जास्त माजी सैनिकांच्या पाल्यांनी लाभ घ्यावा, असेही डोईफोडे यांनी कळविले आहे.

# पुणे-नाशिक रेल्वे प्रकल्प विक्रमी वेळेत पूर्ण करणार : उपमुख्यमंत्री अजित पवार

## पुणे-नाशिक सेमी हायस्पीड डबल लाईन रेल्वे प्रकल्प संदर्भात बैठक

**नाशिक, दि.४ (प्रतिनिधी):** 'पुणे-नाशिक सेमी हायस्पीड डबल लाईन रेल्वे प्रकल्प' हा राज्य शासनाचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प असून या माध्यमातून प्रवासी सेवांसह कृषी उत्पादने आणि मालवाहतुकीला गती मिळणार आहे. पुणे-नाशिक शहरांसह पुणे, अहमदनगर आणि नाशिक या तीन जिल्ह्यांच्या विकासालाही गती मिळणार आहे. कोरोनाचे संकट असले तरी लोकप्रतिनिधींना विश्वासात घेऊन त्यांच्या सहकार्याने हा प्रकल्प विक्रमी वेळेत पूर्ण करु, असा विश्वास व्यक्त करत या प्रकल्पासाठी निधीची कमतरता भासू देणार नसल्याची ग्वाही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मंगळवारी दिली.


मंत्रालयातील उपमुख्यमंत्र्यांच्या दालनात महाराष्ट्र रेल्वे इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट कार्पोरेशन लिमिटेड तथा 'महारेल'च्यावतीने 'पुणे-नाशिक सेमी हायस्पीड रेल्वे प्रकल्पा'चे सादरीकरण उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखालील बैठकीत करण्यात आले. त्यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार बोलत होते. यावेळी महसूलमंत्री बाळासाहेब थोरात, कामगारमंत्री दिलीप वळसे-पाटील, परिवहनमंत्री अनिल परब, परिवहन राज्यमंत्री सतेज पाटील, खासदार डॉ. अमोल कोल्हे, खा. हेमंत गोडसे, आ. दिलीप मोहिते-पाटील, आमदार अशोक पवार, आ. चेतन तुपे, आ. सदाशिव लोखंडे, आ. डॉ. किरण लोहमटे, आ. सरोज आहिरे आदी लोकप्रतिनिधी प्रत्यक्ष व व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे उपस्थित होते. तसेच नाशिकहून जिल्हाधिकारी सुरज मांढरे, उपजिल्हाधिकारी वासंती माळी, 'महारेल'चे महाव्यवस्थापक, वित्त, नियोजन, महसूल विभागाचे वरिष्ठ अधिकारी व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे सहभागी झाले होते. यावेळी सर्व सहभागी प्रतिनिधींनी यासंदर्भात सुचना दिल्या.

### प्रकल्पाची वैशिष्ट्ये

रेल्वे मार्ग पुणे, अहमदनगर आणि नाशिक जिल्ह्यातून जाणार, रेल्वेचा २०० किलोमीटर प्रतितास वेग, पुढे हा वेग २५० किमींपर्यंत वाढविणार, पुणे-नाशिक अंतर अवघ्या पावण दोन तासांत कापणार, प्रवासी आणि मालवाहतूक चालणार, रेल्वे स्थानकात प्रकल्पबाधितांसह, स्थानिकांना व्यवसायासाठी प्राधान्य, प्रत्यक्ष, अप्रत्यक्ष रोजगारांच्या मोठ्या संधी उपलब्ध होणार, प्रकल्पाच्या खर्चात ६० टक्के वित्तीय संस्था, २० टक्के राज्य सरकार, २० टक्के रेल्वेचा वाटा.,विद्युतीकरणासह एकाचवेळी दोन्ही रेल्वेमार्गांचे बांधकाम होणार.

# कांदा निर्यात प्रोत्साहन योजना सुरू करण्याची कांदा उत्पादक शेतकऱ्यांची मागणी

**लासलगाव, दि. ४ (प्रतिनिधी):** आशिया खंडातील कांद्याची महत्त्वाची बाजारपेठ मानल्या जाणाऱ्या लासलगाव बाजार समितीसह जिल्ह्यातील सर्वच बाजार समित्यांमध्ये उन्हाळी कांद्याच्या दरात घसरण सुरूच असून कांद्याला कवडीमोल दर मिळत असल्याने शेतकऱ्यांचा लागवडीचा खर्च वसूल होत नसल्याने कांदा उत्पादक शेतकरी हवालदिल झाले आहेत. मंगळवारी लासलगाव बाजार समितीत ९०० वाहनांतून १२,५०० क्विंटल उन्हाळी कांद्याची आवक होऊन बाजार भाव कमीत कमी ४०० रुपये व जास्तीत जास्त ९५१ रुपये, तर सरासरी ७०० रुपये प्रतिक्विंटल भाव मिळाला आहे.



सध्या 'अनलॉक' टप्पा सुरू असला तरी, सर्वच छोट्या-मोठ्या शहरातील हॉटेल्स, ढाबे बंद आहेत, तर सार्वजनिक वाहतूक व्यवस्थाही अद्याप सुरळीत झालेली नाही. अशीच परिस्थिती कायम राहिली तर कांदा टिकेल व कांद्याला चांगला भाव मिळेल, याची शाश्वती राहिलेली नाही. यंदा मान्सूनचे वेळेवर आगमन झाले आहे. कर्नाटक, आंध्र आदी राज्यांमध्ये कांद्याची सर्वात अगोदर लागवड होते. साधारणत: ऑगस्टच्या दुसऱ्या आठवड्यादरम्यान परराज्यातील माल बाजारात आला तर आपल्याकडील कांद्याचे भाव वाढण्याची शक्यताच धूसर असल्याचे मत कांदा क्षेत्रातील जाणकारांनी व्यक्त केले आहे. यंदा सर्वत्र उन्हाळी कांद्याचे मोठ्या प्रमाणावर उत्पादन झाले आहे. कोरोनामुळे कांद्याच्या मागणीत घट निर्माण झाल्याने उत्पादकांसह संबंधित घटकांना त्याचा मोठा फटका बसत असल्याने केंद्र सरकारने कांदा निर्यात प्रोत्साहन योजना सुरू करून निर्यातीला चालना देण्याची मागणी कांदा उत्पादक शेतकऱ्यांकडून होत आहे.


**Vinyl Chemicals (India) Limited**

CIN: L24100MH1986PLC039837
Regd. Office: 7th Floor, Regent Chambers, Jamnalal Bajaj Marg, 208, Nariman Point, Mumbai - 400 021.
Tel: 2282 2708 Fax: 2204 3969 E-mail: cs.vinylchemicals@pidilite.com Website: www.vinylchemicals.com

**EXTRACT OF UNAUDITED FINANCIAL RESULTS FOR THE QUARTER ENDED 30.06.2020**

(₹ In lakhs)

| Particulars | For the Quarter ended | | For the Year ended | |
|---|---|---|---|---|
| | 30.06.2020 | 30.06.2019 | 31.03.2020 | 31.03.2019 |
| | Unaudited | Unaudited | Audited | Audited |
| Total income | 3012 | 8682 | 37606 | 48635 |
| Profit/(loss) for the period before tax | 158 | 104 | 999 | 1400 |
| Profit/(loss) for the period after tax | 116 | 72 | 746 | 886 |
| Total Comprehensive Income for the period [comprising Profit for the period (after tax) and Other Comprehensive Income (after tax)] | 115 | 72 | 743 | 884 |
| Equity Share Capital (Face value of share: ₹ 1) | 183 | 183 | 183 | 183 |
| Reserves (excluding Revaluation Reserve) as shown in the Audited Balance Sheet of the previous year | | | 5931 | 5720 |
| Earnings per share of ₹ 1 each in ₹: | | | | |
| Basic | @0.63 | @0.39 | 4.07 | 4.83 |
| Diluted | @0.63 | @0.39 | 4.07 | 4.83 |

@ For the period only and not annualised

**Notes:**

The above is an extract of the detailed Unaudited Financial Results filed with the Stock Exchanges under Regulation 33 of SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015. The full Unaudited Financial Results are available on the Websites of BSE Ltd. www.bseindia.com and National Stock Exchange of India Ltd. www.nseindia.com and on the Company's Website www.vinylchemicals.com.

Mumbai
Dated: 4th August, 2020

**M.B. PAREKH**
**Chairman & Managing Director**
(DIN: 00180955)


# घरोघरी आरोग्य सर्वेक्षण

**इगतपुरी :** 'जनसेवा प्रतिष्ठान'च्या उपक्रमानुसार तहसीलदार परमेश्वर कासुळे, मुख्याधिकारी निर्मला गायकवाड-पेखळे, वैद्यकीय अधीक्षक डॉ. स्वरुपा देवरे यांच्या मार्गदर्शनाखाली इगतपुरी शहरात 'कोविड-१९' अंतर्गत घरोघरी जाऊन आरोग्य सर्वेक्षण सुरू करण्यात आले आहे. इगतपुरी नगर परिषद व जनसेवा प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम सुरू आहे. विषय समजून घेऊन आपली बुद्धी, अनुभव, शिक्षण, कौशल्य आणि जनसंपर्क यांचा उपयोग करून लोकांचे जीवनमान उंचावण्याचे काम 'जनसेवा प्रतिष्ठान' करत असल्याचे यावेळी सांगण्यात आले. कार्यकर्त्यांनी १ हजार, ६० पेक्षा जास्त कुटुंबांचे सर्वेक्षण केले. 'जनसेवा प्रतिष्ठान'चे अध्यक्ष किरण फलटणकर यांनी विविध उपक्रम सुरू राहणार असल्याचे सांगितले. यावेळी, मुख्याधिकारी निर्मला गायकवाड म्हणाल्या की, ''कोरोना संसर्गावर विजय मिळवण्यासाठी नगर परिषद व 'जनसेवा प्रतिष्ठान' यांच्या संयुक्त विद्यमाने घरोघरी जाऊन आरोग्य सर्वेक्षण सुरु केले आहे.''

# या महसूल वर्षापासून '८-अ' चा ऑनलाईन उतारा देण्याची सुविधा

**नाशिक दि. ४ (प्रतिनिधी):** महसूल विभाग हा शासन व प्रशासनाचा कणा आहे. या महसूल वर्षात '८-अ' हा ऑनलाईन उतारा देण्याची सुविधादेखील सुरू करण्यात आली असल्याचे महसूलमंत्री बाळासाहेब थोरात यांनी सांगितले. ऑनलाईन महसूल दिन कार्यक्रमात राज्याचे महसूल मंत्री थोरात, अन्न नागरीपुरवठा व ग्राहक संरक्षणमंत्री छगन भुजबळ, कृषिमंत्री दादाजी भुसे यांनी कौतुकाची थाप दिली.

महाराष्ट्र शासन
महसुल विभाग

नाशिक विभागात ऑनलाईन महसूल दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमांतर्गत नाशिक विभागातील सर्व जिल्हे व तालुक्यातील कोतवालांपासून ते अप्पर जिल्हाधिकारी असे सर्व साधारण अडीच ते तीन हजार महसूल अधिकारी कर्मचारी उपस्थित होते. या नावीन्यपूर्ण कार्यक्रमासाठी राज्याचे महसूलमंत्री बाळासाहेब थोरात, नाशिक जिल्ह्याचे पालकमंत्री छगन भुजबळ, कृषिमंत्री दादाजी भुसे, महसूल राज्यमंत्री अब्दुल नबी सत्तार सर्व मंत्रिमहोदयांनी महसूल विभागाचे अभिनंदन केले. जिल्हाधिकारी कार्यालयातील मध्यवर्ती सभागृहात व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे ऑनलाईन पद्धतीने मंगळवारी नाशिक विभागाचा महसूल दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमासाठी महसूलमंत्री बाळासाहेब थोरात, जिल्ह्याचे पालकमंत्री छगन भुजबळ, कृषिमंत्री दादाजी भुसे, नाशिक जिल्हाधिकारी कार्यालयातून विभागीय आयुक्त राजाराम माने, पाचही जिल्ह्यांचे जिल्हाधिकारी सुरज मांढरे, संजय यादव, अभिजित राऊत, राहुल द्विवेदी, डॉ. राजेंद्र भारूड, उपायुक्त दिलीप स्वामी, रघुनाथ गावडे यांच्यासह विभागातील सर्व जिल्ह्यांचे अप्पर जिल्हाधिकारी यांच्यासह सर्व कर्मचारी आदी व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे उपस्थित होते.

# 'अक्षर' नियतकालिकाचे प्रकाशन

**नाशिक, दि. ४ (प्रतिनिधी):** केटीएचएम महाविद्यालयाच्यावतीने प्रत्येक वर्षी वरिष्ठ व कनिष्ठ महाविद्यालयाचे एकत्रित 'अक्षर' हे नियतकालिक प्रसिद्ध होत असते. यावर्षी प्रथमच कनिष्ठ महाविद्यालयीन स्तरावर स्वतंत्र 'अक्षर' नियतकालिक तयार करण्यात आले. 'पर्यावरण विशेषांक' असलेल्या या नियतकालिकाकरिता विद्यार्थी व शिक्षकांनी उत्स्फूर्तपणे मराठी, हिंदी व इंग्रजी भाषांमधून लेख, कविता, घोषवाक्य, चारोळ्या व चित्रांच्या माध्यमातून पर्यावरण संरक्षणाविषयी विचार व्यक्त केलेले आहे. महाविद्यालयातील एनसीसी, राष्ट्रीय सेवा योजना, मान्यवरांची व्याख्याने तसेच विविध उपक्रम समाजप्रबोधनपर रॅली यांचाही या नियतकालिकात समावेश करण्यात आलेला आहे. पर्यावरणास समर्पक असे मुखपृष्ठ आर्या ढगे या विद्यार्थिनीने तयार केले आहे. वार्षिक नियतकालिकातून विद्यार्थ्यांच्या प्रतिभाशक्तीस चालना मिळून अभिव्यक्त होण्याची संधी मिळते, तसेच विविध उपक्रमास प्रेरणा व साहित्यनिर्मिती होते, असे प्रतिपादन प्रकाशनप्रसंगी केटीएचएम महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. बी. गायकवाड यांनी केले.


**मार्कसन्स फार्मा लिमिटेड**

CIN: L24110MH1992PLC066364
नोंदणीकृत कार्यालय: ११वा मजला, ग्रॅण्डीयर, वीरा देसाई विस्तारित मार्ग, ओशिवरा, अंधेरी, (पश्चिम), मुंबई-४०० ०५३.
दूरध्वनी: ०२२ ४००१ २०११, फॅक्स क्र.: ०२२ ४००१ २०११, ईमेल: info@marksanspharma.com

**दि. ३० जून, २०२० रोजी संपलेल्या तिमाहीकरिता अलेखापरिक्षित वित्तीय परिणाम**

(रू. दशलक्षामध्ये)

| अनु. क्र. | तपशील | स्वतंत्र | | | एकत्रित | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | संपलेले तीन महिने | | संपलेले मागील वर्ष | संपलेले तीन महिने | | संपलेले मागील वर्ष |
| | | ३०.०६.२०२० | ३०.०६.२०१९ | ३१.०३.२०२० | ३०.०६.२०२० | ३०.०६.२०१९ | ३१.०३.२०२० |
| | | (अलेखापरिक्षित) | (अलेखापरिक्षित) | (लेखापरिक्षित) | (अलेखापरिक्षित) | (अलेखापरिक्षित) | (लेखापरिक्षित) |
| १ | कार्यातून एकूण उत्पन्न | १,५६०.०८ | ९४५.६६ | ४,३३५.८८ | ३,३१३.३४ | २,४७२.१० | ११,३४५.३७ |
| २ | करपूर्व कालावधीकरिता निव्वळ नफा/(तोटा) | २४९.२१ | ७९.०९ | ५२७.२७ | ६१४.०२ | २७६.१२ | १,५७१.७३ |
| ३ | करपश्चात कालावधीकरिता निव्वळ नफा/(तोटा) | २२०.५६ | ५६.५५ | ३७९.०३ | ४९३.६५ | २२४.८२ | १,२०७.५४ |
| ४ | कालावधीकरिता एकूण सर्वसमावेशक उत्पन्न (करपश्चात) कालावधीकरिता नफा/(तोटा) आणि इतर सर्वसमावेशक उत्पन्न (करपश्चात) | २२१.०३ | ५६.६६ | ३८०.६६ | ६०५.४९ | २०३.९९ | १,२७३.१८ |
| ५ | भरणा केलेले समभाग भांडवल (दर्शनी मूल्य रू.१ प्रत्येकी) | ४०९.३१ | ४०९.३१ | ४०९.३१ | ४०९.३१ | ४०९.३१ | ४०९.३१ |
| ६ | प्रतिभागावर मिळकत (दर्शनी मूल्य रू.१ प्रमाणे) | | | | | | |
| | – मूलभूत : | ०.५४ | ०.१४ | ०.९३ | १.२० | ०.५२ | २.८६ |
| | – सौम्यिकृत : | ०.५४ | ०.१४ | ०.९३ | १.२० | ०.५२ | २.८६ |

**नोंदी:**

उपरोक्त परिणाम हे सेबी (सुचीबद्धता दायित्वे आणि प्रकटीकरण आवश्यकता) नियमन, २०१५ च्या नियमन ३३ अन्वये स्टॉक एक्सचेंजकडे दाखल केलेल्या ३० जून, २०२० रोजी अलेखापरिक्षित त्रैमासिक वित्तीय निष्कर्षाच्या तपशीलवार स्वरूपाचे निष्कर्ष आहेत. अलेखापरिक्षित त्रैमासिक वित्तीय निष्कर्षाचे तपशीलवार स्वरूप www.nseindia.com आणि www.bseindia.com येथे आणि कंपनीची वेबसाईट www.marksanspharma.com वर देखील उपलब्ध आहे.

**मार्कसन्स फार्मा लिमिटेड करिता**

ठिकाण : मुंबई
दिनांक : ४ ऑगस्ट, २०२०

**मार्क सलदान्हा**
**अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक**
**DIN : 00020983**

www.marksanspharma.com

**भागधारकांना महत्वाचे संवाद**

**मार्क्सन फार्मा लिमिटेडच्या भागधारक ज्यांनी अद्याप आपला ई-मेल पत्ता नोंदविला नाही त्यांनी कंपनीच्या वार्षिक अहवाल, सूचना इत्यादींसह सर्व संप्रेषण इलेक्ट्रॉनिकरित्या प्राप्त करण्यासाठी कंपनीच्या निबंधक आणि हस्तांतरण एजंट मेसर्स बिगशेअर सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेडकडे आपला ई-मेल पत्ता नोंदवावा अशी विनंती केली जाते. ई-मेल पत्ता निबंधक आणि हस्तांतरण एजंटच्या वेबसाइट दुव्याद्वारे https://www.bigshareonline.com//InvestorRegistration.aspx वर नोंदणीकृत केला जाऊ शकतो.**